## क्रिकेट बेटींगवर ऑनलाईन जुगार घेणारे व खेळणा-यांचा गुन्हे शाखा युनिट ३ ने, केला पर्दापाश

---

मा.अपर पोलीस आयुक्त श्री.अशोक मोराळे, गुन्हे पुणे यांना क्रिकेट बेटींगवर जुगार चालू असले बाबत माहिती मिळाल्याने त्यांनी गुन्हे शाखा युनिट-३, चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राजेन्द्र मोकाशी यांना त्याबाबत माहिती देऊन खात्री करुन करुन कारवाई करण्याबाबतचे आदेश दिले.

त्याअनुषंगाने पोलीस उप-आयुक्त गुन्हे श्री. शिरीष सरदेशपांडे, सहा.पोलीस आयुक्त गुन्हे -१ श्री. समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मोकाशी, यांनी दि.०३/०७/२०१९ रोजी युनिट -३, चे पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड, राजकुमार केंद्रे, किरण अडागळे, पोलीस स्टाफ किशोर शिंदे, दिपक मते,राहूल घाडगे, व इतर पोलीस पथकासह मिळालेल्या माहिती प्रमाणे दामोदर विहार सोसायटी फ्लॅट नं.१ दामोदर नगर हिंगणे खुर्द सिंहगड रोड पुणे येथील फ्लॅटमध्ये छापा टाकला असता न्यूझीलंड विरुध्द इंग्लड या क्रिकेट मॅचवर ऑनलाईन जुगार घेणारे १) सचिन वसंत चव्हाण वय ३८ वर्ष रा. दामोदर विहार सोसायटी फ्लॅट नं.१ दामोदरनगर हिंगणे खुर्द सिंहगड रोड पुणे. २) अमोद भगवंत खळदकर वय ५० वर्षे रा. १७६ नारायण पेठ एल आय सी बिल्डींग समोर पुणे. व जुगार खेळणारे १) राहूल गोरखनाथ जगताप वय ३८ वर्षे रा. गल्ली नं.५/६ फ्लॅट नं.५१ काकडेनगर कोंढवा बुद्रूक पुणे. २) पृथ्वीराज शंकर येळवंडे वय ३८ वर्षे रा. १०५२ बुधवारपेठ पुणे. यांना पकडून त्यांचे ताब्यातून एक एच पी कंपनीचा लॅपटॉप, वेगवेगळया कंपनीचे ८ मोबाईल फोन व रोख रक्कम १०,९४०/- असा एकूण १,१८,९४०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन त्यांचे विरुध्द सिंहगड रोड पोलीस स्टेशन येथे भा.दं.वि.कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१,३४ महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४, ५, इंडीयन टेलीग्राफ कायदा कलम २५(क), सह आय टी ॲक्ट २००८ चे कलम ४३,६६,८४(ब) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास गुन्हे शाखा युनिट-३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेन्द्र मोकाशी हे करीत आहेत.

सदरची कामगिरी अपर पोलीस आयुक्त श्री,अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त श्री.शिरीष सरदेशपांडे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे शाखा -१ श्री.समीर शेख, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेन्द्र मोकाशी, पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड, राजकुमार केंद्रे, किरण अडागळे, पोलीस स्टाफ किशोर शिंदे, दिपक मते,राहूल घाडगे, मेहबुब मोकाशी, रोहिदास लवांडे,प्रविण तापकिर, संदीप राठोड, विल्सन डिसोझा, सचिन गायकवाड,अतुल साठे, सुजित पवार यांच्या पथकाने केली आहे.